# <u>निवडणुक ध्रुवीकरणाचे श्रीमती सोनिया गांधी यांचे निष्फळ प्रयत्न</u>

**-अरुण जेटली**
विरोधी पक्षनेते (राज्यसभा)

ऑगस्ट वेस्टलँड वीवीआयपी हेलिकॉप्टर सौद्याबाबत "दी इंडियन एक्सप्रेस" मध्ये प्रकाशित झालेल्या हकीकत चे आपण सर्व साक्षीदार आहोत. 1980 सालातली ही पुनरावृत्ती म्हणता येईल. मार्टीन आर्डबो त्यावेळी बोफोर्स तोफ उत्पादन कंपनीचे प्रमुख होते. मार्टीन आर्डबो यांची डायरी जप्त करण्यात आली होती. त्यांनी डायरित लिहिलेल्या विविध लिखाणामुळे असे संकेत मिळाले होते की क्यु अक्षर नावाने सुरुवात होणा-या व्यक्तिला वाचवण्यात आले. सर्व निरिक्षक विचार करत होते की क्यु अक्षराच्या नावाने सुरुवात होणारी व्यक्ती कोण असावी. 1993 मध्ये स्वीस अधिका-यांनी दिलेल्या माहितीमध्ये असा उल्लेख करण्यात आला होता की, त्यांनी बोफोर्स तोफ सौद्यात लाच देण्यात आली होती. त्यांनी बँक खात्यांची माहिती सुद्धा दिली होती. त्या खात्यात नोंद घेण्यासारखी रक्कम जमा करण्यात आली होती, याचा लाभार्थी हा क्यु अक्षराच्या नावाने सुरुवात होणारी व्यक्ती होती. क्यु अक्षराच्या नावाने सुरुवात होणा-या व्यक्तीला भारतातून पळून जाण्यासाठी मुभा देण्यात आली होती आणि बाकीच्या घटनाक्रमाचा इतिहास साक्षी आहे.

वीवीआयपी हेलिकॉप्टर सौद्यात सुद्धा लाच देण्यात आल्याचा उल्लेख त्या अहवालात करण्यात आला आहे. तथापि युपिए सरकारने नुकताचा तो सौदा रद्द केला आहे. इंडियन एक्सप्रेसच्या अहवालात सांगण्यात आले आहे की त्यावेळी ईटालियन दलाल यांनी असा उल्लेख केला होता की भारतातील महत्त्वाच्या निर्णयांमध्ये श्रीमती सोनिया गांधी यांचा प्रभाव दिसून येतो. पंतप्रधान हे त्यांच्या अनेक श्रेष्ठ सल्लागारांपैकी एक आहेत. हे दलाल हुशार आहेत. कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोचण्याआधी ते अभ्यास करायचे. या परिस्थितीत मला मार्टीनच्या डायरीची आठवण आली.

श्रीमती सोनिया गांधीसाठी ही बाब खरोखर चिंताजनक आहे. भारत सरकार भारताच्या आतील जनता आणि बाहेरच्या लोकांना कशाप्रकारे पाहते? काय ती सोन्याची खोदकाम करणारी सरकार आहे. काय ती एक भ्रष्ट मशीनीचे संचालन करणारी सरकार आहे. सरकारची छबी खरोखर खुपच भ्रष्ट आहे.

आर्थिक स्तरावर सरकारची कामगीरी पण खेदजनक राहिली आहे. 2012-13 चा शेवटचा आकडा दर्शवतो की, 4.5 टक्के जीडीपी दर आहे. युपीए-2 ची आर्थिक सिद्धि ही श्री चिदंबरम यांनी म्हटल्याप्रमाणे एका पोस्टल स्टँपच्या मागे लिहता येईल एवढीच सिमीत आहे. हल्लीच निवडणुक निकालांचा सत्ताधारी पक्षासाठी निराशाजनक चित्र प्रस्तुत केले आहे. त्याच्या आधारे असे बोलले जाऊ शकते की, 2014 च्या लोकसभा निवडणुकांत प्रभावशाली छाप पाडण्यात त्यांचे नेते निष्फळ ठरतील.

अशा प्रतिकुलतेच्या दरम्यान, युपिएचे अध्यक्ष भयावह परिस्थितिचा सामना करत आहेत. विकासलक्षी अजेंड्यावर लढायच्या ऐवजी ते विष पसरवणा-या टीका करित आहेत. त्यांना निवडणुकांत ध्रुवीकरण पाहिजे आहे. त्यांची निराशा समजु शकेल अशी आहे. सांप्रदायिकतेचा रंग देऊन निवडणुकीच्या ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, पण हा त्यांचा प्रयत्न काही परिणाम करील की नाही ती एक वेगळी बाब आहे.